नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे | Year - 4rd
अंक - १४७ | Issue - 147
वार - शुक्रवार दि. २३ ऑक्टोबर २०२६ | Blow- Friday Date 23 OCTOBER 2026
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४ | Pages - 4
किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs
पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## शिक्षक-पदवीधर निवडणुकीच्या पाच जागांसाठी आज मतदान

### १८२ उमेदवारांची प्रतिष्ठा पणाला



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीसाठीची रणधुमाळी (एश्रशलींळेप २०२६) आज म्हणजेच शुक्रवार, २३ ऑक्टोबर रोजी रंगणार आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदानाची प्रक्रिया पार पडणार असून, पाच जागांसाठी एकूण १८२ उमेदवार निवडणूक रिंगणात असून त्यांचं भवितव्य आज मतपेटित कैद होणार आहे. यात पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर विभागातील पदवीधर म तदारसंघ, तसेच अमरावती आणि पुणे विभागातील शिक्षक मतदारसंघांसाठी ही निवडणूक होत आहे. दरम्यान, पाचही मतदारसंघांसाठी प्रशासनाने जय्यत तयारी केल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. तर पाचही मतदारसंघांसाठी दोन हजार ४१९ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून १० लाख ६८ हजार ७२ मतदार आज आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यामुळे आज मतदानातून मतद-रराजा कोणाला कौल देतो आणि विधान परिषदेच्या मैदानात आता नेमकं कोण बाजी मारणार हे आता निकालाअंती समजणार आहे.

राज्यात आज (२३ ऑक्टोबर) विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी मतदान होतंय. पाच जागांसाठी १८२ उमेदवार रिंगणात उतरल्याने निवडणुकीत कमालीची चुरस निर्माण झालीये. त्यातच महायुतीम ध्ये झालेली बंडखोरी आणि पक्षांतर्गत नाराजीमुळे महायुतीच्या अधिकृत उम ेदवारांची धास्ती वाढलीय. तर मविआम ध्ये मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याने या निवडणुकीत कोण बाजी मारणार याकडे सर्वांचं लक्ष लागलंय. पदवीधरच्या ३ जागांसाठी तर शिक्षक मतदारसंघाच्या २ जागांसाठी ही निवडणूक होतेय. छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि नागपूर पदवीधरसाठी, तर अमरावती आणि पुणे शिक्षक मतदारसंघासाठी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान पार पडणार आहे. छत्रपती संभाजीनगरसाठी ८ जिल्ह्यात मतदान होतंय. पुणे शिक्षक आणि पदवीधरसाठी पुणे,सोलापूर,सातार ा,सांगली,कोल्हापूर या ठिकाणी मतदान पार पडणार आहे. अमरावती शिक्षक मतदारसंघासाठी अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, अकोला, वाशिम इथे मतदान होतंय. तर नागपूर पदवीधरसाठी नागपूर, चंद्रपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली इथे मतदान होत आहे.

## नियंत्रण सुटलेल्या बसची झाडाला धडक; ६ प्रवाशांचा जागीच अंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



रायपूर: प्रवाशांनी भरलेली बस नियंत्रण सुटल्यानं भरधाव वेगात रस्त्याच्या कडेला असलेल्या एका झाडावर जाऊन आदळली. या अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला. बसमध्ये ३० पेक्षा जास्त प्रवासी होते. यात महिला आणि लहान मुलांचादेखील समावेश आहे. छत्तीसगडच्या म नेंद्रगड-चिरमिरी-भरतपूर जिल्ह्यात हा अपघात झाला. अपघातात बसमधील अनेक जण जखमी झाले आहेत.

केल्हारी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या हंसवाही परिसरात बसला अपघात झाला. अपघा-ताची माहिती मिळताच पोलिसांचं पथक घटनास्थळी पोहोचलं. अपघातात ६ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

प्राथमिक माहितीनुसार बसचा वेग जास्त होता. त्यामुळे चालकाचं बसवरील नियंत्रण सुटलं. सेमरमथानी परिसरात असलेल्या वळणावर बस एका झाडावर जाऊन आदळली. या अपघातात ६ जणांचा मृत्यू झाला. तर जवळपास २५ प्रवासी जखमी झाले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बस अपघ-ातात चालकासह १५ जण गंभीर झाले आहेत. त्यांना उपचारांसाठी मणेंद्रगढ जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अन्य १० जणांवर केल्हारीच्या सार्वजनिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत. अपघात इतका भीषण होता की बसच्या पुढील भागाचा अक्षरश: चेंदामेंदा झाला. मृतांमध्ये तीन पुरुष, दोन महिला आणि एका मुलीचा समावेश आहे. मृत आणि जखमींची ओळख अद्याप पटलेली नाही. पोलिसांकडून जखमी आणि मृतांची यादी तयार केली जात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चालकाचं बसवरील नियंत्रण अचानक सुटलं. त्यामुळे बसचा अपघात झाला. बसवरील नियंत्रण सुटण्यामागचं नेमकं कारण अद्याप समोर आलेलं नाही. अपघातांमागील कारणांचा शोध घेतला जात आहे. प्राथमिक माहितीनुसार, अपघ-ातावेळी बसमध्ये ३० पेक्षा जास्त प्रवासी होते. बस अचानक अनियंत्रित झाल्याची माहिती प्रवाशांनी दिली. ही बस मणेंद्रगढहून केल्हारीच्या दिशेनं जात होती. दुपारी दोनच्या सुमारास सेमरमथानी वळणावर चालकाचं बसवरील नियंत्रण सुटलं. त्यामुळे बस रस्त्याच्या कडेला असलेल्या एका झाडावर जाऊन आदळली.

## एसटी बसस्थानकांवरील अस्वच्छतेस विभाग नियंत्रक जबाबदार : मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एसटी बसस्थानकांवरील प्रसाधनगृहांची स्वच्छता राखण्यात हलगर्जीपणा झाल्यास संबंधित विभाग नियंत्रकांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. प्रवाशांना स्वच्छ, निरोगी आणि आरोग्यदायी सुविधा उपलब्ध करून देणे ही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची मूलभूत जबाबदारी असून, स्वच्छतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे निर्देश परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले.

एसटी महामंडळाच्या मुख्यालयात आयोजित स्वच्छता आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला महामंडळाचे विभागप्रम ुख, प्रादेशिक व्यवस्थापक आणि विभाग नियंत्रक उपस्थित होते.

एसटी महामंडळ प्रवाशांकडून दोन रुपये स्वच्छता अधिभार आकारते. या अधिभाराच्या बदल्यात प्रवाशांना स्वच्छतेच्या किमान सुविधा उपलब्ध होणे अपेक्षित आहे. त्यामुळे बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे स्वच्छ ठेवणे आणि प्रवाशांच्या आरोग्याची काळजी घेणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असे परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले. बसस्थानकांवरील प्रसाधनगृहांमध्ये स्वच्छतेच्या काम ात कोणत्याही प्रकारची कुचराई होता कामा नये. प्रवाशांच्या रास्त अपेक्षा पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी अधिक दक्षतेने काम करावे, असे निर्देशही त्यांनी दिले. बसस्थानकांवरील प्रसाधनगृहांची नियमित तपासणी करावी, स्वच्छतेच्या कामावर सातत्याने लक्ष ठेवावे आणि संबंधित कंत्राटदार संस्थांकडून करारातील अटींनुसार स्वच्छता करून घ्यावी, असे निर्दे श परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिले. स्वच्छतेची जबाबदारी केवळ कंत्राटदारांवर सोपवून चालणार नाही. आपल्या कार्यक्षेत्रातील बसस्थानकांवर नियमित स्वच्छता राखली जात आहे की नाही, याची खातरजमा संबंधित अधिकाऱ्यांनी स्वतः करणे आवश्यक आहे. प्रवाशांना स्वच्छ सुविधा उप-लब्ध करून देण्यात कसूर झाल्यास संबंधित विभाग नियंत्रकांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

## पुढील नऊ महिने जिल्ह्यातील नागरिकांना पाणी उपलब्ध राहील, अशा पद्धतीने काटेकोर नियोजन करावे : जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : दुष्काळाच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसाठी जिल्ह्यातील सर्व संबंधित विभागांनी पुढील नऊ महिने नागरिकांना पाणी उपलब्ध राहील, अशा पद्धतीने काटेकोर नियोजन करावे. आवश्यक उपाययोजनांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात दुष्काळी उपाययोजनांबाबत आयोजित बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, लाभक्षेत्र प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता सुभवेंद्र खांडेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक लांडगे, भूजल विभागाचे वरिष्ठ वैज्ञानिक सादीक शेख, महावितरणचे अधीक्षक अभियंता सु-नील माने, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व्ही. डी. राठोड, सहाय्यक नियोजन अधिकारी प्रीतम कुंटला यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने पुढील आठवड्यात कृती आराखडा तयार करून सादर करावा.

या आराखड्यात गावनिहाय पाणी नियोजनाचा समावेश असावा, असे निर्दे श जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. पाणीपुरवठा विभागाला फीडिंग पॉईंटच्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ६० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्यासाठी प्रस्ताव सादर करावा, असेही त्यांनी सांगितले.

भूजल विभागाने रिचार्ज शाफ्टसाठी आवश्यक निधीची मागणी करावी. सर्व संबंधित यंत्रणांनी तातडीने प्रस्ताव सादर करावेत. पालकमंत्र्यांची मान्यता घेऊन प्राधान्यक्रमानुसार निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी म्हटले.

पाणीपुरवठा विभागाने तात्पुरत्या नळ पाणीपुरवठा योजनांची तसेच पाणीटंचाईग्रस्त क्षेत्रांची माहिती सादर केल्यास त्या ठिकाणी योजना राबविण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल. हा विषय अत्यंत संवेदनशील असल्याने पाणीपुरवठा विभागाने आपल्या अंतर्गत असलेल्या सर्व तालुकास्तरीय उपअभियंत्यांची बैठक घेऊन आवश्यक माहिती संकलित करावी आणि त्यानुसार प्रस्ताव सादर करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी भूजल विभागाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक सादीक शेख यांनी अकरा तालुक्यांतील १०७ गावांमध्ये १ हजार १०५ रिचार्ज शाफ्ट उभारण्यासाठी ८ कोटी १९ लाख रुपयांचा प्रस्ताव नियोजन विभागाकडे सादर केल्याची माहिती दिली. महावितरण कंपनीने ३४६ स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर आणि ५४ कॅपॅसिटर बसविण्यासाठी २० कोटी रुपयांच्या निधीची मागणी केल्याचे सांगितले.

मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक लांडगे यांनी सिमेंट नाला बंधारा दुरुस्ती, नवीन सिमेंट नाला बंधारे आणि पाझर तलाव दुरुस्ती यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याची माहिती दिली. जिल्हा परिषदेच्या मृद व जलसंधारण विभागाने ३४ केटीवेअर बंधारा दुरुस्तीसाठी अडीच कोटी रुपये, गेट बसविण्यासाठी नऊ कोटी रुपये, पाझर तलाव दुरुस्तीसाठी ४५ लाख रुपये आणि सिमेंट नाला बंधारा दुरुस्तीसाठी १० कोटी रुपयांचे प्रस्ताव तयार केल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत ‘इंडिया केम २०२६’चे उद्‌घाटन**

**रासायनिक उद्योगासाठी पालघरमध्ये मोठे औद्योगिक केंद्र विकसित करण्याचे नियोजन**

## रासायनिक उत्पादनांचे वैश्विक केंद्र बनण्याची भारताला संधी : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई ‘ॲडव्हान्टेज्ड भारत : न इमर्जिंग ग्लोबल केमिकल हब’ या संकल्पनेवर आधारित ‘इंडिया केम २०२६’ हे प्रदर्शन उद्योग क्षेत्रातील धोरणकर्ते, गुंतवणूकदार, संशोधक आणि उद्योजकांना एकत्र आणण-ारे महत्वाचे व्यासपीठ ठरत आहे. या माध्यमातून नवीन भागीदारी, गुंतवणुकीच्या संधी आणि जागतिक पुरवठा साखळ्यांमधील भारताचा सहभाग वाढविण्यास चालना मिळेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. या माध्यमातून देशाला जागतिक रासायनिक उत्पादन केंद्र बनविण्याची संधी असल्याचेही प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितले.

गोरेगाव येथील नेस्को एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित ‘इंडिया केम २०२६’ या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत केंद्रीय रसायने मंत्री जगतप्रसाद नड्डा यांच्या हस्ते झाले. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी, केंद्रीय राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांच्यासह विविध राज्यांचे प्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी, उद्योग क्षेत्रातील मान्यवर आणि देश-विदेशातील गुंतवणूकदार उपस्थित होते. या प्रसंगी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ‘इंडिया केम २०२६’ निमित्त दिलेल्या संदेशात भारताच्या रासायनिक आणि पेट्रोकेमिकल उद्योगाचे अर्थव्यवस्थेतील महत्व अधोरेखित केले. केंद्रीय मंत्री नड्डा यांनी हा संदेश वाचून दाखवला.

कृषी, औषधनिर्मिती, वस्त्रोद्योग आणि वाहननिर्मिती यांसारख्या विविध क्षेत्रांसाठी रासायनिक उत्पादनांची आवश्यकता असून, या उद्योगाची वाढ देशांतर्गत उत्पादन आणि आत्म निर्भर भारताच्या उद्दिष्टांशी निगडित आहे, असेही त्यांनी संदेशात म्हटले. रासायनिक उद्यानांच्या विकासासाठी भव्य रसायन योजनेची अंमलबजावणी आणि संशोधन, विकास व नवोन्मेष योजनेत रासायनिक व पेट्रोकेमिकल क्षेत्राचा समावेश हे उद्योगाच्या वाढीसाठी महत्त्वाचे टप्पे आ-हेत. सेमीकंडक्टर उत्पादन, स्वच्छ ऊर्जा आणि विद्युत वाहनांसाठी आवश्यक प्रगत रसायनांची वाढती मागणी लक्षात घेता, भारतीय उद्योगांनी आधुनिक तंत्रज्ञान आणि उच्च मूल्यवर्धित उत्पादनांमध्ये गुंतवणूक करावी. शाश्वत उत्प-ादन पद्धती आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर यांनाही प्राधान्य द्यावे, असे आवाहन प्रधानमंत्री यांनी केले.



रासायनिक व पेट्रोकेमिकल उद्योगाच्या विकासासाठी केंद्र सरकार अनुकूल धोरणे, पायाभूत सुविधा आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्यावर भर देत आहे. भारताची रासायनिक उद्योगातील सध्याची बाजारपेठ सुमारे २२० अब्ज अमेरिकी डॉलरची असून, २०४० पर्यंत ती एक ट्रिलियन अमेरिकी डॉलरपर्यंत आणि २०४७ पर्यंत १.६ ट्रिलियन अमेरिकी डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारे, उद्योग क्षेत्र, संशोधक आणि गुंतवणूकदार यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे, असे केंद्रीय रसायने मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्री नड्डा म्हणाले, केंद्र सरकारच्या भव्य रसायन उद्यान (बल्क ड्रग पार्क) योजनेत प्रत्येक उद्यानासाठी एक हजार कोटी रुपयांपर्यंतचे केंद्रीय सहाय्य देण्याची तरतूद असून, संबंधित राज्याने किमान ५०० कोटी रुपये खर्च करणे अपेक्षित आहे. या माध्यमातून जागतिक दर्जाची औद्योगिक परिसंस्था निर्माण करून एकात्मिक मूल्यसाखळी, खर्चातील स्पर्धात्मकता आणि शाश्वत उत्पादनाला प्रोत्साहन देण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या रासायनिक औद्योगिक क्षेत्रांचे आधुनिकीकरण आणि पायाभूत सुविधांमधील त्रुटी दूर करण्यावरही केंद्र सरकार भर देत आहे. औद्योगिक क्षेत्रांतील पायाभूत सुविधा, मालवाह-तूक हाताळण्याची क्षमता आणि इतर आवश्यक सुविधांबाबत राज्य सरकारे व उद्योग संघटनांकडून माहिती घेऊन आवश्यक सुधारणा करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.

भारताचे जागतिक व्यापार संबंध अधिक व्यापक करण्यासाठी विविध देश आणि व्यापार समूहांशी मुक्त व्यापार करारांबाबत चर्चा सुरू आहे. या माध्यमातून भारतीय रासायनिक उद्योगाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये अधिक संधी उपलब्ध होतील. केंद्र सरकार उद्योग क्षेत्रातील अडचणी समजून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी सातत्याने संवाद साधत असून, विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उद्योग क्षेत्राचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असल्याचे नड्डा यांनी यावेळी स्पष्ट केले.

रासायनिक उद्योगातील गुंतवणुकीला चालना देण्यासाठी म हाराष्ट्र शासन स्वतंत्र रासायनिक उद्योग धोरण तयार करीत असून, हे धोरण नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात जाहीर करण्यात येणार आहे. वाढत्या औद्योगिक गरजा, गुंतवणुकीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि उद्योगस्नेही वातावरण यांचा विचार करून हे धोरण तयार करण्यात येत असून पालघर जिल्ह्यात वाढवण बंदराच्या परिसरात मोठे रासायनिक उद्योग केंद्र विकसित करण्याचे नियोजन असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील सुमारे ३,६०० उद्य-ोग रासायनिक क्षेत्रात कार्यरत आहेत. देशाच्या रासायनिक उद्योगातील एकूण स्थूल मूल्यवर्धनात महाराष्ट्राचा सुमारे १९ टक्के, तर रासायनिक उत्पादनांच्या निर्यातीत सुमारे १७ टक्के वाटा आहे. राज्यात पेट्रोकेमिकल्स, कृषी रसायने, विशेष रसायने, पॉलिमर आणि औद्योगिक रसायनांच्या निर्मितीसाठी अनुकूल वातावरण आहे. रासायनिक उद्योगासाठी स्वतंत्र धोरण तयार करताना उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींशी चर्चा करून त्यांच्या गरजा आणि भविष्यातील गुंतवणुकीच्या अपेक्षा विचारात घेण्यात आल्या आहेत. उद्योगांना परवानग्या मिळविणे सुलभ व्हावे, गुंतवणूकदारांना एकाच ठिकाणी आवश्यक सेवा उपलब्ध व्हाव्यात आणि उद्योगांना विविध विभागांच्या प्रक्रियाम ुळे अडथळे येऊ नयेत, यासाठी शासन प्रयत्नशील असून त्यासाठी ‘मैत्री’ हे एक खिडकी व्यासपीठ आणि ‘इन्व्हेस्ट महाराष्ट्र’ या उपक्रमाच्या माध्यमातून गुंतवणूकदारांना सुलभ सेवा देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

## संपादकीय....

### वैश्विक केंद्र

'ॲडव्हान्टेज्ड भारत : न इमर्जिंग ग्लोबल केमिकल हब' या संकल्पनेवर आधारित 'इंडिया केम २०२६' हे प्रदर्शन उद्योग क्षेत्रातील धोरणकर्ते, गुंतवणूकदार, संशोधक आणि उद्योजकांना एकत्र आणणारे महत्वाचे व्यासपीठ ठरत आहे. या माध्यमातून नवीन भागीदारी, गुंतवणुकीच्या संधी आणि जागतिक पुरवठा साखळ्यांमधील भारताचा सहभाग वाढविण्यास चालना मिळणार आहे. गोरेगाव येथील नेस्को एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित 'इंडिया केम २०२६' या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे उद्घाटन नुकतेच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला. कृषी, औषधनिर्मिती, वस्त्रोद्योग आणि वाहननिर्मिती यांसारख्या विविध क्षेत्रांसाठी रासायनिक उत्पादनांची आवश्यकता असून, या उद्योगाची वाढ देशांतर्गत उत्प-ादन आणि आत्मनिर्भर भारताच्या उद्दिष्टांशी निगडित आहे. रासायनिक उद्यानांच्या विकासासाठी भव्य रसायन योजनेची अंमलबजावणी आणि संशोधन, विकास व नवोन्मेष योजनेत रासायनिक व पेट्रोकेमिकल क्षेत्राचा समावेश हे उद्योगाच्या वाढीसाठी महत्त्वाचे टप्पे आहेत. सेमीकंडक्टर उत्पादन, स्वच्छ ऊर्जा आणि विद्युत वाहनांसाठी आवश्यक प्रगत रसायनांची वाढती मागणी लक्षात घेता, भारतीय उद्योगांनी आधुनिक तंत्रज्ञान आणि उच्च मूल्यवर्धित उत्पादनांमध्ये गुंतवणूक करावी. शाश्वत उत्पादन पद्धती आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर यांनाही प्राधान्य देण्यात येणार आहे. रासायनिक व पेट्रोकेमिकल उद्योगाच्या विकासासाठी केंद्र सरकार अनुकूल धोरणे, पायाभूत सुविधा आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्यावर भर देत आहे. भारताची रासायनिक उद्योगातील सध्याची बाजारपेठ सुमारे २२० अब्ज अमेरिकी डॉलरची असून, २०४० पर्यंत ती एक ट्रिलियन अमेरिकी डॉलरपर्यंत आणि २०४७ पर्यंत १.६ ट्रिलियन अमेरिकी डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारे, उद्योग क्षेत्र, संशोधक आणि गुंतवणूकदार यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

# आई अंबाबाईचा उदो उदो च्या गजरात नळदुर्ग येथे सिमोलंघ्घन उत्साहात संपन्न

## आमदार राणा जगजितसिंह पाटील व सुनिल मालक चव्हाण यांच्यासह हजारो भाविकांनी घेतले दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : विजयादशमीच्या निमित्ताने येथे आई अंबाबाई मठ मंदिर येथून भक्तीमय वातावरणामध्ये पालखी सोहळ्याला सुरुवात करण्यात आली हा सोहळा चांगल्या पद्धतीने साजरा करण्यात आला.

यावेळी तुळजापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी पालखीला खांदा देऊन आई अंबाबाईचे दर्शन घेतले त्याच बरोबर तुळजा- पूर तालुक्याचे युवा नेतृत्व युवकांचे श्रद्धास्थान सुनील मालक चव्हाण यांनी आई अंबाबाईच्या चरणी नतम स्तक होऊन दर्शन घेतले नळदुर्ग येथील श्री जगदंबादेवी अंबाबाई मंदिरातील देवीच्या पालखीचे मनोभावे हजारो भाविक भक्तानी दर्शन घेतले. यावेळी सीमोल्लंघन सोहळ्याच्या भव्य मिरवणुकीत खूप मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.

आई जगदंबादेवी अंबाबाईच्या कृपाशीर्वादाने सर्वांच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी आणि सम ाधान नांदो. विशेष म्हणजे शेतकरी सुखावला पाहिजे सर्वांच्या मनोकामना पूर्ण होवोत.

आशी भावना नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी व्यक्त केली.

आई अंबाबाईचा उदो उदो या जयघोषाने नळदुर्ग शहर दुमदुमले.

पालखी सोहळ्यात नळदुर्ग शहरातील महिला व पुरुषांनी मोठा प्रमाणात सहभाग नोंदविला आणि आई अंबाबाईचे हजारो भावकेने भक्तांनी मनोभावी दर्शन घेतले.





# सुधाकर पंथांच्या स्मृतिदिनी चारा वाटप, पांडुरंग परिवाराचा उपक्रम; गोशाळेतील मुक्या जीवांना दिलासा



पंढरपूर : दुष्काळाच्या झळांनी माणसासोबत मुक्या जनावरांचा विचार याचा प्रश्न गंभीर झाला आहे. अशा परिस्थितीत व शाळांच्या जनावरांची पोटांची खळगी व त्यांना चारा पाण्याअभावी हाल सोसावी लागून, संवेदनशील भावनेतून सुधारपंथ परिचारक यांच्या जयंतीनिमित्त पांडुरंग परिवारातील शहर व तालुक्याच्या वतीने गोशाळेतील जनावरांच्या साऱ्यांचा उपक्रम राबवण्यात आला व सामाजिक बांधिलकी जपणारे राबवलेल्या उपक्रमातून मुक्या जीवांना दिल- ासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सध्या दुष्काळी परिस्थितीमुळे जनावरांसाठी हिरवा चारा आणि पाण्याची उपलब्धता करणे कठीण झाले आहे. पशुधन जगण्यासाठी शेतकऱ्यांना व गोशाळा चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. अशा संकटाच्या काळात गो शाळेतील जवानांना चारा उपयोग करून देण्यासाठी पांडुरंग परिवाहाने हा उपक्रम हाती घेतला आहे. युवक नेते प्रणव परिचारक, लक्ष्मण धनवडे, महादेव धोत्रे, शुभम आगवणे, माऊली हलवा, भागवत बडवे अरुण नाग टिळक, हर्षद कदम, आबा पवार युवराज मुचलंबे, शहाजी चव्हाण , सोमनाथ सरडे, सोमनाथ माने दिगंबर कांबळे, संतोष चव्हाण पदाधिकारी उप- स्थित होते.

**सध्या दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे जनावरांना चारा आणि पाणी उपलब्ध करून देणे कठीण झाले आहे. अशा काळात मुक्या जनावरांची पोटाची आभाळ होऊ नये, त्यांना उडीसा चारा मेळावा यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. मुक्या जनावरांची सेवा करणे ही आपली जबाबदारी असून, संकटाच्या काळात पाठीशी उभे राहणे हेच खरे कर्तव्य आहे.**

**– लक्ष्मण धनवडे, संचालक**
**स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक,**
**पांडुरंग सहकारी साखर कारखाना,**

# शाहिर गौतम जाधव यांनी शाहिरीतून मांडली दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची व्यथा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : राज्यात निर्माण झालेल्या गंभीर कोरड्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर, बळीराजाच्या वेदना आणि मनातील आर्त टाहो शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रसिद्ध शाहिर गौतम जाधव निम ति यांनी या काळाच्या दिवसा पाव माझ्या नवसा, येरे येरे पावसा हे विशेष व्हिडिओ गीत सादर केले असून विशेष मोलाचे सहकार्य अमर जाधव, गोरख राठोड,प्रभू डोके, रोहित म्हस्के, तान- ाजी शिनगारे, बबन खरात,महेंद्र म्हस्के, तानाजी म्हस्के,गजानन कहाळे,ज्ञानदेव ससाने, अधिकार घेवंदे,छायाचित्रिरण विजय भालमोडे, रेकॉर्डिस्ट आकाश हाजगुडे,दिग्दर्शक संकलन महेंद्र भारसाखळे या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

**शाहिरी डफाचा कडकडाट आणि गाण्याचे बोल या काळाच्या दिवसा पाव माझ्या नवसा, येरे येरे पावसा**

पिण्याच्या पाण्याची टंचाई डोळ्यांसमोर जळणारी पिके आणि डोक्यावर वाढणारा कर्जाचा डोंगर राज्यात निर्माण झालेल्या गंभीर कोरड्या दुष्काळामुळे आज आमचा बळीराजा पुरता खचून गेला आहे.

आपल्या खणखणीत शाहिरीच्या माध्यमातून शाहिर गौतम जाधव यांनी दुष्काळात होरपळणाऱ्या बळीर- ाजाची वास्तववादी परिस्थिती मांडली आहे. पिण्याच्या पाण्याचे हाल, वाळ- णारी पिके आणि डोक्यावर वाढणारा कर्जाचा डोंगर यामुळे खचलेल्या शेतकऱ्याला शासनाच्या मदतीची आणि पा- वसाची कशी नितांत गरज आहे, हे या गीतातून अतिशय प्रभावीपणे रेखाटले आहे.

शेतकऱ्यांच्या या भावनांना वाचा फोडणारे हे व्हिडिओ गीत सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून, शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ ठोस मदत जाहीर करावी, अशी मागणी या शाहिरीच्या माध्यमातून लावून धरली जात आहे.

# इंटरनॅशनल रिस्क रिडक्शन डे निमित्त देवी भक्तांनी गिरविले आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर प्रतिनिधी : फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या वतीने इंटरनॅशनल रिस्क रिडक्शन डे निमित्त आपत्ती व्यवस्थापन या विषयावर प्रबोधन व प्रात्यक्षिक कार्यक्रम ाचे आयोजन सोलापूर येथील श्री. रूपा भवानी देवस्थान येथे देवी भक्तांकारिता करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस निरीक्षक सचिन यादव यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामीण प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. श्रीकांत येळेगावकर हे होते. यावेळी नगरसेवक विनायक विटकर, स्वीकृत नगरसेवक ज्ञानेश्वर मॅकल, श्री. रूपाभवानी मंदिर समितीचे ट्रस्टी मल्लिनाथ मसरे, पो- लीस निरीक्षक विजय खोमणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नागेश येणपे, सागर बामणे, गणेश इंगळे, राधा जेऊघाले आधी पोलीस अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे आपदा मित्र रामचंद्र वाघम ारे व बजरंग व्हटकर, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, गीतगंगा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष व्यंकटेश कंची, वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक विजय खोमणे म्हणाले की, श्री. रूपा भवानी देवस्थान येथे दरवर्षी नवरात्र महोत्सवात सोला- पूर शहर व जिल्ह्यातील तसेच तेलंगाना, आंध्र व कर्नाटक आदी राज्यातील भाविक लाखोंच्या संख्येने दरवर्षी दर्शनासाठी येत असतात. भाविकांच्या या लोंढ्याला नियंत्रित करण्यासाठी पोलिसांना जिकरीचे काम करावे लागते. एखादी अफवा किंवा गैरसमज मोठ्या आपत्तीला आमंत्रण देऊ शकते याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे मांढरदेवी येथील भाविकांच्या मोठ्या प्रमाणात झालेल्या चेंगराचेंगरीचे उदाहरण आहे. म्हणूनच येणाऱ्या भाविकांसाठी आपत्ती व्यवस्थापनाची प्रबोधन व प्रात्यक्षिक महत्त्वाचे आहे. आपदा मित्र रामचंद्र वाघमारे व बजरंग व्हाटकर यांनी देवी भक्तांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक व प्रबोधन केले. त्याचप्रमाणे म ोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने याचा परिणाम वृद्ध, महिला व लहान बालकांवर मोठ्या प्रमाणात होतो. यामुळे हृदयविकाराचा धोका उत्पन्न झाल्यास तत्काल सी.पी. आर. देता यावे यासाठी श्री.रुपाभवानी देवी मंदिर परिसरात कार्यरत असलेल्या स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले. अध्यक्ष समारोप करताना डॉ. श्रीकांत येळेगावकर म्हणाले की, आपत्ती ही सांगून येत नाही तर ती अचानक येते अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी स्वयंसेवकाने तयार असले पाहिजे. आणि महत्वाचे म्हणजे आपत्ती येऊच नये यासाठी सुयोग्य पूर्व नियोजन महत्त्वाचे आहे. आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात हज- ारो भाविकांनी व स्वयंसेवकांनी आ- पत्ती व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनाचा व प्रात्यक्षिकांचा याचा लाभ घेतला. या कार्यक्रमात गीतगंगा सोशल फाउंडेशन, सारथी युथ फाऊंडेशन, सखी वन स्टॉप सेंटर, रोटरी क्लब ऑफ सोलापूर, सोल- ापूर महानगरपालिका आरोग्य विभाग, जिल्हा शलचिकेचा कार्यालय सोलापूर जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष सोलापूर, डॉ. हेडगेवार रक्तपेढी सोला- पूर, जिज्ञासा महानगर सोलापूर, नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन सोलापूर, निमा वुमेन्स फोरम सोलापूर, दयानंद कला व विज्ञान महाविद्यालय एनएसएस विभाग, वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय समाजकार्य विभाग, हिंदू एकता मंच, विश्व हिंदू महासभा, अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान कोल्हापूर आदी सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत मल्लिनाथ मसरे यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले, सूत्रसंचालन आकाश गायकवाड यांनी केले तर आभार व्यंकटेश कंची यांनी मानले.

# सोलापूर जिल्ह्यात ई-केवायसी पूर्णत्वाचे प्रमाण ८०.४७ टक्क्यांवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर जिल्ह्या- तील ई-केवायसी प्रगती अहव- ालानुसार, १९ ऑक्टोबर २०२६ रोजी ई-केवायसी पूर्णत्वाचे प्रमाण ८०.४७ टक्के झाले आहे. १५ ऑक्टोबर रोजी हे प्रमाण ८०.३४ टक्के होते. चार दिवसांत ई-केवायसी पूर्णत्वाच्या प्रमाणात ०.१३ टक्क्यांची वाढ झाली आहे. जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये एकूण १७ लाख ७९ हजार ८१५ आधार संलग्न सदस्य असून, त्यापैकी १० लाख ४४ हजार ०६६ सदस्यांची ई-केवायसी पूर्ण झाली आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे यांनी दिली आहे.

ई-केवायसी प्रक्रियेत सांगोला तालुक्याचे प्रमाण सर्वाधिक ८५.६२ टक्के आहे. त्यानंतर पंढरपूर तालुक्यात ८२.६४ टक्के, माढा तालुक्यात ८२.२० टक्के, उत्तर सोलापूर तालुक्यात ८१.११ टक्के आणि अक्कलकोट तालुक्यात ८०.५९ टक्के ई-केवायसी पूर्ण झाली आहे.

**३ लाख ४७ हजार ५११ सदस्यांची ई-केवायसी अद्याप अपूर्ण, तरी लाभार्थ्यांनी ई-केवायसी तात्काळ करावी**

करमाळा तालुक्यात ८०.४६ टक्के, दक्षिण सोलापूरमध्ये ७९.४३ टक्के, मंगळवेढा तालुक्यात ७९.१२ टक्के, माळशिरस तालुक्यात ७८.५६ टक्के, मोहोळ तालुक्यात ७८.३८ टक्के आणि बार्शी तालुक्यात ७७.९६ टक्के ई-केवायसी पूर्णत्वाची नोंद आहे.

जिल्ह्यात अद्याप ३ लाख ४७ हजार ५११ सदस्यांची ई-केवायसी पूर्ण झालेली नाही. एकूण आधार संलग्न सदस्यांच्या तुलनेत हे प्रमाण १९.५३ टक्के आहे. तालुकानिहाय अपूर्ण ई-केवायसीमध्ये माळशिरस तालुक्यात सर्वाधिक ५८ हजार ६०२ सदस्य, बार्शी तालुक्यात ४८ हजार ४९४, माढा तालुक्यात ३४ हजार ११४, पंढरपूर तालुक्यात ३१ हजार ३५८ आणि दक्षिण सोलापूर तालुक्यात ३१ हजार १५१ सदस्यांचा समावेश आहे.

ई-केवायसी प्रक्रियेत काही तालुक्यांमध्ये सुधारणा दिसून येत असली, तरी जिल्ह्याचे एकूण प्रमाण अद्याप ८१ टक्क्यांच्या खाली आहे. त्यामुळे उर्वरित पात्र सदस्यांची ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी तालुकानिहाय प्रगतीचा आढावा घेणे आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे महत्त्वाचे ठरणार आहे.

तालुकानिहाय प्रगतीवर एक नजर : १९ ऑक्टोबरच्या अह- वालानुसार सांगोला तालुका ८५.६२ टक्क्यांसह प्रथम क्रम ांकावर, तर बार्शी तालुका ७७.९६ टक्क्यांसह शेवटच्या क्रमांकावर आहे. जिल्ह्याची एकूण प्रगती ८०.४७ टक्के असून, १९.५३ टक्के सदस्यांची ई-केवायसी अद्याप अपूर्ण आहे.

# पत्रकारांना कथित धमक्या व खोट्या गुन्ह्यांत अडकविण्याच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



गोंदिया : सालेकसा तालुक्यातील साखरीटोला-सातगाव प्राथमिक आरोग्य केंद्राशी संबंधित बातमी प्रसिद्ध केल्यानंतर पत्रकारांना कथितरीत्या धमकावणे, त्यांना वसुलीबाज आणि बनावट पत्रकार असे संबोधून बदनाम करणे तसेच फौजदारी प्रकरणात अडकविण्याचा प्रयत्न केल्याचे आरोप समोर आले आहेत. या प्रकरणी व्हॉइस ऑफ मीडिया, गोंदिया जिल्हा, तालुका पत्रकार संघटना सालेकसा आणि व्हॉइस ऑफ मीडिया, सालेकसा यांच्या वतीने जिल्हाधिकारी, गोंदिया यांना निवेदन सादर करून निष्पक्ष चौकशी व दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. मागण्यांवर कारवाई न झाल्यास पोलीस अध- ीक्षक कार्यालय, गोंदिया येथे बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशाराही संघटनांनी दिला आहे.

निवेदनानुसार, साखरीटोला- सातगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत तेलसे व कर्मचारी यांच्याशी संबंधित कथित मानसिक छळ आणि अपमानाच्या प्रकरणाबाबत १ ऑक्टोबर २०२६ रोजी जावक पत्र क्रमांक ६३/२६ द्वारे जिल्हा परिषद, गोंदिया येथील मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणाशी संबंधित बातम्या विविध वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्या.

पत्रकार संघटनांच्या आर- ोपानुसार, बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर सातगाव येथील राजू काडे यांनी पत्रकारांना कथितरीत्या धमकावले तसेच त्यांच्या सामाजिक आणि व्यावसायिक प्रतिष्ठेला धक्का पोहोचविण्याचा प्रयत्न केला. याशिवाय, पैशांची मागणी केल्याच्या आरोपावरून पत्रकारांविरुद्ध सालेकसा पो- लीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याचाही उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे.

पत्रकार संघटनांनी पत्रकारांविरुद्ध दाखल प्रकरणातील पैशांच्या म ागणीच्या आरोपांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच पत्रकारांना कथित धमक्या देणे, त्यांची बदनामी करणे आणि खोटी तक्रार किंवा असत्य जबाबांच्या माध्यमातून त्यांना गुन्ह्यात अडकविण्याच्या आरोपांचीही सखोल चौकशी करण्यात यावी, अशी म

**कारवाई न झाल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा**

ागणी करण्यात आली आहे. यासाठी संबंधित व्यक्तींचे जबाब, कागदपत्रे, उपलब्ध ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग आणि इतर पुराव्यांची नियमानुसार तपासणी करण्याची मागणी निवेदना- तून करण्यात आली आहे. चौकशीत जाणीवपूर्वक खोटी तक्रार किंवा खोटे पुरावे सादर केल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

या प्रकरणाची चौकशी वरिष्ठ आणि निष्पक्ष पोलीस अधिकाऱ्यामार्फत करण्यात यावी, संबंधित पत्रकारांना सुरक्षा पुरविण्यात यावी तसेच निवेदनावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती द्यावी, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत. या निवेदनाच्या प्रती राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्यपाल, पोलीस महासंचालक, पोलीस अधीक्षक गोंदिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

व्हॉइस ऑफ मीडिया, गोंदिया जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष व सुप्रीमो राम लाल सहारे आणि महिला जिल्हाध्यक्ष आरती पारधी कटरे यांच्यासह इतर सदस्यांनी सांगितले की, पत्रकारिता हे जनहिताचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. त्यामुळे पत्रकारांविरुद्ध करण्यात आलेल्या आरोपांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

मागण्यांवर योग्य कारवाई न झाल्यास किंवा चौकशीत अनावश्यक विलंब झाल्यास पूर्वसूचना देऊन पो- लीस अधीक्षक कार्यालय, गोंदिया येथे बेमुदत उपोषण सुरू करण्याचा विचार केला जाईल, असा इश- ारा पत्रकार संघटनांनी दिला आहे. या प्रकरणात आता जिल्हा प्रशासन आणि पोलीस विभाग काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी सोलापूर जिल्हा प्रशासन सज्ज

## १९३ मतदान केंद्रांवर आज मतदान; १,१६५ कर्मचारी नियुक्त, मतदान साहित्य घेऊन पथके रवाना : जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार असून, सोलापूर जिल्ह्यात निवडणूक प्रक्रिया सुरळीत, शांततेत आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी ११७, तर शिक्षक मतदारसंघासाठी ७६ अशी एकूण १९३ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. मतदानाची सर्व तयारी पूर्ण झाली असून, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि कर्मचारी आवश्यक साहित्य घेऊन आपापल्या केंद्रांकडे रवाना झाले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिली.

जिल्ह्यातील दोन्ही मतदारसंघांतील मतदान प्रक्रिया व्यवस्थित पार पडावी, यासाठी मनुष्यबळ, मतदान साहित्य, वाहतूक, सुरक्षा, मतपेट्या आणि मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे. निवडणूक कामकाजासाठी संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या असून, विविध स्तरांवर समन्वय ठेवण्यात येत आहे.

मतदान साहित्याचे वाटप; पथके केंद्रांकडे रवाना

निवडणुकीच्या तयारीचा भाग म्हणून दि. २१ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरावरून तालुकास्तरावर आवश्यक मतदान साहित्य, जंबो बॅलेट बॉक्स आणि मतपत्रिकांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर रोजी तिसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले. प्रशिक्षणानंतर तालुकास्तरावरून मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि कर्मचारी मतदानाचे साहित्य घेऊन संबंधित मतदान केंद्रांकडे रवाना झाले.

मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी मतदान प्रक्रियेतील जबाबदाऱ्या, साहित्याचा वापर आणि निवडणूकविषयक नियमांबाबत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. मतदान केंद्रांवर आवश्यक तयारी पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

**पदवीधर मतदारसंघात ४९ हजार ७२२ मतदार**

जिल्हा निवडणूक कार्यालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार, सोलापूर जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी एकूण ४९ हजार ७२२ मतदार नोंदणीकृत आहेत. यामध्ये ३७ हजार ७३० पुरुष आणि ११ हजार ९९२ महिला मतदारांचा समावेश आहे.

पदवीधर मतदारसंघासाठी माळशिरस येथे सर्वाधिक ६ हजार ५१७ मतदार आहेत, तर सोलापूर शहर मध्य येथे सर्वात कमी २ हजार २५६ मतदार नोंदणीकृत आहेत. मतदारसंघातील मतदारसंख्येनुसार मतदान केंद्रांचे नियोजन करण्यात आले आहे.

**शिक्षक मतदारसंघात १५ हजार ३०३ मतदार**

शिक्षक मतदारसंघासाठी जिल्ह्यात एकूण १५ हजार ३०३ मतदार आहेत. यामध्ये १० हजार ९२७ पुरुष आणि ४ हजार ३७६ महिला मतदारांचा समावेश आहे. पदवीधर आणि शिक्षक अशा दोन्ही मतदारसंघांतील मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी संबंधित मतदान केंद्रांवर आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे.

**११ विधानसभा क्षेत्रांमध्ये १९३ मतदान केंद्रे**

सोलापूर जिल्ह्यातील विविध विधानसभा क्षेत्रांमध्ये पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांसाठी स्वतंत्र मतदान केंद्रांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार करमाळा येथे पदवीधर मतदारसंघासाठी १० आणि शिक्षक मतदारसंघासाठी ८ मतदान केंद्रे; माढा येथे अनुक्रमे १३ आणि ९; बार्शी येथे ११ आणि ९; मोहोळ येथे ११ आणि ७ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

सोलापूर शहर उत्तर येथे पदवीधरांसाठी ८ आणि शिक्षकांसाठी २, तर सोलापूर शहर मध्य येथे अनुक्रमे ४ आणि १ मतदान केंद्र आहे. अक्कलकोट येथे १० आणि १०, दक्षिण सोलापूर येथे १० आणि ६, पंढरपूर येथे १५ आणि ९, सांगोला येथे १२ आणि ९, तर माळशिरस येथे १३ आणि ६ मतदान केंद्रांचे नियोजन करण्यात आले आहे. या केंद्रांद्वारे जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**१,१६५ कर्मचारी नियुक्त; सहा भरारी पथकांद्वारे देखरेख**

निवडणूक कामकाजासाठी पदवीधर मतदारसंघाकरिता ७०५, तर शिक्षक मतदारसंघाकरिता ४६० असे एकूण १ हजार १६५ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि राखीव कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी कायदा व सुव्यवस्था, मनुष्यबळ व्यवस्थापन, मतदान साहित्य, वाहतूक आणि संगणकीकरण या कामांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी भरारी पथकांमार्फत देखरेख ठेवण्यात येत आहे.

सोलापूर विभागासाठी २, कुर्डूवाडी विभागासाठी २ आणि पंढरपूर विभागासाठी २ अशी एकूण ६ भरारी पथके कार्यरत आहेत. ही पथके आचारसंहितेच्या अनुषंगाने लक्ष ठेवून आवश्यक कार्यवाही करीत आहेत.

**४६६ जंबो बॅलेट बॉक्सची व्यवस्था**

मतदान प्रक्रियेसाठी ३८६ जंबो बॅलेट बॉक्स आणि ८० अतिरिक्त बॅलेट बॉक्स, असे एकूण ४६६ जंबो बॅलेट बॉक्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मतदान साहित्याच्या सुरक्षित साठवणुकीसाठी सोलापूर येथील रामवाडीमधील शासकीय अन्नधान्य गोदामात जिल्हास्तरीय स्ट्राँग रूम निश्चित करण्यात आली आहे.

मतदान साहित्याची उपलब्धता, त्याची सुरक्षित हाताळणी आणि निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याचे नियोजन यावर प्रशासनाकडून लक्ष ठेवण्यात येत आहे.

**मतदान केंद्रांवर मूलभूत सुविधांची व्यवस्था**

मतदानासाठी येणाऱ्या मतदारांना सुविधा मिळाव्यात, यासाठी सर्व मतदान केंद्रांवर आवश्यक मूलभूत व्यवस्था करण्यात येत आहे. यामध्ये रॅम्प, पिण्याचे पाणी, वीज, फर्निचर, शौचालय, वैद्यकीय संच आणि मदत कक्षाचा समावेश आहे. मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध राहतील, याची दक्षता संबंधित यंत्रणांकडून घेतली जात आहे.

**२३ ऑक्टोबरला मतदान; २७ ऑक्टोबरला मतमोजणी**

पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघासाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. मतमोजणी सोमवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी होणार असून, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

जिल्ह्यातील सर्व संबंधित यंत्रणा समन्वयाने कार्यरत असून, मतदान प्रक्रिया शांततेत आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी आवश्यक तयारी करण्यात आली आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदारांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# खालिंग बुद्रुक जमीन प्रकरणात खळबळ! हयात व्यक्तींना मृत दाखवून वारस नोंदीचा प्रयत्न केल्याचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील मौजे खालिंग बुद्रुक येथील जमीन प्रकरणात कथित बनावट मृत्यू प्रमाणपत्रांच्या आधारे वारस नोंदी करण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. सर्व्हे क्रमांक ११५/३/३, १०/३/७/४/अ, १०/४/३/३/ब, ६/१३ आणि १९/७/२ या जमिनींसंदर्भातील फेरफार नोंद क्रमांक १७६४ व १७६५ प्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात भिवंडी तहसीलदार आणि पडघा पोलीस ठाण्यात निवेदन सादर करण्यात आले आहे.या तक्रारीमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

**कथित बनावट मृत्यू प्रमाणपत्रांचा संशय; फेरफार नोंदींच्या चौकशीची तहसीलदार व पोलिसांकडे मागणी**

तक्रारदार भीमा बाई पितांबरे, वामन भोईर आणि योगेश शेलार यांच्या तक्रारीनुसार, २८ सप्टेंबर २०२६ रोजी फेरफार क्रमांक १७६४ आणि ३० सप्टेंबर २०२६ रोजी फेरफार क्रमांक १७६५ अंतर्गत वारसांची नावे नोंदविण्यासाठी कथित बनावट मृत्यू दाखले व सत्यप्रतिज्ञापत्रे सादर करण्यात आल्याचा आरोप आहे. हयात असलेल्या व्यक्तींना मृत दाखवून शासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाल्याचेही तक्रारदारांनी म्हटले आहे.

संबंधित मृत्यू प्रमाणपत्रांवर ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे नाव असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच, १९९४ ते १९९७ या कालावधीतील मृत्यू नोंदींच्या प्रमाणपत्रांची सत्यता तपासण्याची मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणातील सर्व फेरफार फाईल्सची तपासणी करून संबंधित मृत्यू प्रमाणपत्रांची ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून अधिकृत पडताळणी करावी आणि चौकशीत गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नसून, संबंधित प्रमाणपत्रे आणि फेरफार नोंदींच्या चौकशीनंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

# पंढरपूर तालुक्यातील एक लाख ५० हजार शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५००० ची मदत मिळण्याची आशा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्र राज्यात ३०५ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले असून. बाधित शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना तातडीची मदत म्हणून पाच हजार रुपये देण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर पंढरपूर तालुक्यात सुमारे ७० हजार हेक्टर क्षेत्रावर पंचनामे पूर्ण करण्यात आले असून या नुकसानामुळे बाधित आलेली एक लाख ५००० तातडीची आर्थिक मदत मिळण्याची आशा निर्माण झाले आहे. या संदर्भातील प्रस्ताव तहसील कार्यालयातून जिल्हाधिकारी कार्यालय एस कीर्तीकेयन सादर करण्यात आल्याची समजते.

पंढरपूर तालुक्यात यंदा पावसाने वर दिल्याने शेतीचे अर्थकारण कोलमडली आहे. तालुक्यात सुमारे पावसाने ५० टक्के पाऊस कमी झाल्याने खरीप हंगामातील पिकांना मोठा मटका बसला आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेले शेतकरी ने पेरण्या केल्या मात्र पिकांना पुढचे पाणी न मिळाल्यामुळे पिके करपून गेली आहे. उत्पादन घेण्याची क्षमताही कमी झाली आहे. भिमुख व कडधान्य इतर पिकाची मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे फळबागावरही पाणीटंचाईचा मोठा फटका बसला आहे. डाळिंब केळी या पिकाचे उत्पादन संकटात आले असून, पिकाच्या वाढीच्या महत्वाचे टप्प्यावर पाऊस न आल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.

रपूर तालुका हा निरा उजवा कालवा उजनी धरणाच्या पाणीपुरवठ्यामध्येय व्यवस्थित पाणीपुरवठा बावळट शेतीसाठी वळला जातो मात्र यंदा पावसाचे प्रमाण कमी झाल्यानेक्ष शेती समोरील संकट अधिक गरज आहे. पावसावर अवलंबून असले शेतीबरोबरचह फळबाग आणि इतर नगदी पिकावर ही पाणीटंचाईचा फटका बसला आहे.

मिळणार याकडे शेतकऱ्यांची लक्ष लागले आहे. खरीप हंगाम हंगामा हातातून गेला आणि रब्बी हंगामी प्रतीक्षेत असल्याने न झालेली पंढरपूर तालुक्यात शेतकरी अडचणी सापडलेला आहे. अशा परिस्थिती शासनाने जाहीर केलेली तातडीची मदत त्वरित मिळणे महत्वाची ठरणार आहे.



# ‘माझी पाटी, माझा अभिमान’ उपक्रमातून संस्कृतीचे जतन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शिक्षणाच्या श्रीगणेशासाठी प्राथमिक शिक्षणात पाटी ला महत्वाचे स्थान आहे. दसऱ्याच्या दिवशी शस्त्रपूजन व पाटीपूजनाचे पौराणिक व ऐतिहासिक महत्त्व आहे. साडेतीन मुहूर्तापैकी एक समजल्या जाणा-या दस-याच्या पूर्वसंध्येला वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर निफाड शाळेतील विद्यार्थ्यांनी 'माझी पाटी माझा अभिमान ' उपक्रम राबवून पाटीपूजन करून आपल्या प्राचीन संस्कृती व परंपरेचे जतन केले.

मुख्याध्यापक गोरख सानप यांनी दस-याला गुरुकुल पद्धतीत पाटीपूजनाचे महत्त्व समजावून सांगितले. किरण खैरनार यांनी दस-याच्या पौराणिक कथा सांगितल्या. विद्यार्थ्यांनी आपली पाटी स्वच्छ पुसून त्यावर सरस्वतीचे प्रतिकात्मक चित्र रेखाटले. त्यावर फुले, हळद, कुंकु, अक्षदा वाहून या देवी सर्वभुतेषू बुद्धिरूपेण संस्थिता नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः या मंत्राचा जाप करीत शिक्षिका प्रतिभा खेरनार व शिक्षकवृंद यांनी सामुहिक पाटीपूजन केले.

**वैनतेय विद्यामंदिरात चिमुकल्यांचे 'पाटीपूजन'**




सद्ध्याच्या आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाच्या काळात पाटी पेन्सिलची जागा महागड्या वही, पेन, टॅब, लॅपटॉप, संगणकाने घेतली असली तरी दस-याला पाटीपूजन करून आपली संस्कृती जतन करण्याचा संदेश देणा-या या उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, संस्थेचे सचिव रतन वडघुले, विश्वस्थ किरण कापसे, राजेंद्र राठी, ड दिलीप वाघावकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत, विश्वास कराड, नरेंद्र नांदे निफाड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी, विस्तारअधिकारी एल. के. भरसट, नवनाथ सुडके मुख्याध्यापक गोरख सानप, केंद्रप्रमुख सुरेश धारराव व पालकांनी कौतुक केले.

**प्राथमिक शिक्षणात विद्यार्थ्यांना आपले भाव विश्व व्यक्त करण्यासाठी पाटी हे कमी खर्चीक उत्तम साधन आहे. पाटी हे केवळ एक शैक्षणिक साधन नसून ते सुजाण नागरिक घडवण्याचे पहिले व्यासपीठ आहे. 'पाटीपूजनाचा' अमूल्य ठेवा जपणारा चिमुकल्यांचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे.**

**– वि. दा. व्यवहारे, कार्यकारी अध्यक्ष**
**न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ, निफाड**

### आदिती फाउंडेशनच्या वतीने आयोजन; महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन

# जुळे सोलापुरात महिलांचा गरबा-दांडिया उत्सव उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी नागेश : श्रीचिप्पा) : जुळे सोलापूर येथील आदिती फाउंडेशनच्या वतीने महिलांसाठी आयोजित करण्यात आलेला ‘नवरात्री गरबा-दांडिया उत्सव’ जामगोंडी मंगल कार्यालय येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात महिला व मुलींनी मोठ्या संख्येने सहभागी होत गरबा आणि दांडियाचा आनंद लुटला.

या उत्सवाचे उद्घाटन दिलीप माने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पृथ्वीराज माने, जयश्री दिलीप माने, मयुरी पृथ्वीराज माने, श्रीकांत मिलके पाटील, सौ. जयश्रीताई मिलके पाटील, डॉ. युवराज माने, अमोल जोशी, सायली जोशी, डॉ. अंबिका यावलकर आणि डीसीपी प्रितम यावलकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांना सांस्कृतिक व्यासपीठ उपलब्ध व्हावे आणि नवरात्रोत्सवाचा आनंद घेता यावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांसाठी मोफत प्रवेश तसेच लकी ड्रॉच्या माध्यमातून आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती.





या उपक्रमाचे नियोजन आदिती फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा भारतीय जनता युवा मोर्चाचे सोलापूर शहर उपाध्यक्ष रवी तुळशीराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. उत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या मोफत गरबा-दांडिया प्रशिक्षण शिबिरालाही महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महिलांचा उत्साह, पारंपरिक वेशभूषा आणि गरबा-दांडियाच्या तालावर रंगलेल्या वातावरणामुळे संपूर्ण कार्यक्रमात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. महिलांना सांस्कृतिक व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या आदिती फाउंडेशनच्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

# माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे पदवीधर शिक्षक निवडणूक बैठक संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पुणे पदवीधर मतदारसंघाच्या महाविकास आघाडीचे उमेदवार जाधव आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार जयंत तासगावकर यांच्या प्रचारार्थ आज माजी उपमुख्यमंत्री विजय शिंदे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कृष्णप्रिया हॉल जिथे बैठक मेळावा संपन्न झाला.

ावेळी पदवीधर व शिक्षक मतदार संघातील मतदारांची संवाद साधू महायुगासागाडीच्या दोन्ही उमेदवारांना पहिल्यापासून तिची बहुमूल्य मत देऊन मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आव्हान करण्यात आले.

ावेळी मोठ्या संख्येने पदवीधर शिक्षक मतदार व पक्षाचे नेते पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# बळीराजाच्या लेकरांवर मृत्यूची टांगती तलवार!



## दैनंदिन १,३४२ मेट्रिक टन चाऱ्याची गरज

## अक्कलकोट तालुक्यात १ लाख पशुधन धोक्यात

## चारा डेपो चालू करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट /कमलाकर सोनकांबळे

आभाळाने पाठ फिरवली, धरणी दुभंगली आणि बळीराजाचे डोळे रक्ताचे अश्रू गाळू लागले आ-हेत. ज्यांच्या कातडीवर पडलेल्या कष्टांच्या घामामुळे आज आपली चूल पेटते, त्या हतबल मुक्या जनावरांच्या नशिबी आज अस्मानी संकट आणि प्रशासकीय उदासिनतेची काळीकुट्ट कुऱ्हाड कोसळली आहे.

> **सध्या विहिरी आणि बोअरवेलची पाण्याची पातळी कमालीची खालावली आहे. अशा गंभीर परिस्थितीत प्रशासनाने तातडीने व ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे. केवळ मका बियाणे वाटप करून शासन काय साध्य करणार? ज्यांच्याकडे मुबलक पाणी आहे, त्यांचा प्रश्न सुटेल; पण ज्यांच्याकडे पाण्याची काहीच सोय नाही, त्यांनी काय करायचे? त्यामुळे शासनाने कागदी योजना किंवा पोकळ आश्वासने देण्याऐवजी तातडीने चारा छावण्या सुरू करून पशुपालकांना थेट दिलासा द्यावा. जनतेला सर्व परिस्थिती स्पष्ट समजत आहे.**
>
> **– सतीश कणमुसे पशुपालक, शेतकरी किरणळी**

अक्कलकोट तालुक्यात यंदा पा-वसाने संपूर्ण पाठ फिरवल्याने शून्य पावसाच्या सावलीखाली वावरणारे तब्बल १ लाख ३१५ पशुधन आज अन्नाअन्न दशेत जगण्याचा अत्यंत अमानुष संघर्ष करत आहे.

तालुक्यातील २०,४४२ गाई, २१,०३३ म्हशी, ५,६६१ वासरे, ५६,१८१ शेळ्या आणि ३,०१६ मेंढ्या हे सरकारी दप्तरातील आकडे असून अक्कलकोटच्या प्रत्येक मातीशी एकरूप झालेल्या शेतकऱ्याचा श्वास आणि त्याच्या जिव्हाळ्याचा परिवार आहे. पोटच्या गोळ्यासारखं ज्यांना जिवापाड जपलं, आज त्याच मुक्या जनावरांच्या पोटाची आळंदी कोरडी पडली आहे.

नाल्यांचे बंधारे कोरडेठाक पडले,वरचे गवत करपून मातीमोल झाले आहे आणि डोळ्यांदेखत हिरवीगार पिके जळून राख होताना पाहून बळीराजा अक्षरशः मानसिक व आर्थिकदृष्ट्या कोलमडून पडला आहे.या अथांग पशुधनाला जिवंत ठेवण्यासाठी दररोज लागणारा तब्बल १,३४२ मेट्रिक टन चारा आता आणायचा तरी कुठून? हा विदारक प्रश्न हतबल झालेल्या बळीराजाला रात्रीची शांत झोपही घेऊ देत नाहीये.

निसर्गाच्या प्रकोपाने ग्रासलेल्या या तालुक्यात तातडीने 'चारा छावण्या' सुरू करण्याची अत्यंत तीव्र गरज असताना, प्रशासनाच्या दप्तरात मात्र अजूनही केवळ कागदी घोडे नाचवले जात आहेत. आमच्या हक्काच्या चारा छावण्या कधी सुरू होणार? या अत्यंत आर्त प्रश्नाचे उत्तर द्यायला आज ना प्रशासनाकडे कोणते शब्द आहेत,ना कोणती ठोस कृती!

काळाची ही भीषण पावले वेळीच ओळखून आत्ताच ठोस नियोजन करणे गरजेचे असताना, प्रत्यक्षात मात्र बळीराजाच्या तोंडाला पाने पुसण्याचे प्रकार सुरू आहेत. जर प्रशासनाने तात्काळ पावले उचलली नाहीत, तर येत्या काळात या मुक्या जिवांचे प्राण वाचवणे केवळ कठीणच नव्हे, तर अशक्यप्राय होऊन बळीराजा उद्ध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही.

> **ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची मुबलक सोय उपलब्ध आहे, त्यांना शासनाकडून मका बियाणे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्याची परिस्थिती लक्षात घेता पशुपालकांनी उपलब्ध चारा अत्यंत नियोजनबद्ध रीतीने व जपून वापरावा. तसेच निकृष्ट दर्जाच्या चाऱ्यावर प्रक्रिया व शुद्धीकरण करून पशुधनाची आहाराची सोय करावी आणि पशुधनाच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी.**
>
> **– डॉ. दीपक कडवे**
> **(तालुका पशु संवर्धन अधिकारी पंचायत समिती, अक्कलकोट)**

आम्ही आमचं पोट मारून या मुक्या जिवांना जगवलं, पण आता आभाळानेच दया दाखवली नाही आणि प्रशासन झोपलेलं आहे. आमच्या डोळ्यांसमोर आमची लाडकी जनासयं उपाशी मरताना पाहण्यापेक्षा अधिक दुसरं मोठं मरण कोणतं असेल?एका हतबल शेतकऱ्याची आर्त प्रतिक्रिया आहे.

## शिक्षक कॉलनीत तीन दिवसीय मोफत गरबा-दांडिया-ताली महोत्सव उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : जिजामाता महिला ग्रुप व विठ्ठल-रुक्मिणी गणेश मंडळ, शिक्षक कॉलनी यांच्या संयुक्त विद्यमाने जिजाऊ नगर, शिक्षक कॉलनी येथे १६ ते १८ ऑक्टोबर दरम्यान आयोजित तीन दिवसीय 'नवरंग गरबा-दांडिया-ताली महोत्सव २०२६' उत्स-हात संपन्न झाला. या महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांसाठी दहा दिवसांचे मोफत प्रशिक्षण आणि तीन दिवसांचे सांस्कृतिक कार्यक्रम विनामूल्य आयोजित करण्यात आले होते.

> **नगराध्यक्ष सुनंदाताई कापसे यांच्याकडून आयोजक व प्रशिक्षकांचे कौतुक; विविध स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव**

महोत्सवादरम्यान आकर्षक रोषणाई, मनमोहक सजावट, डीजे, मनोरंजनात्मक खेळ तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सर्वोत्कृष्ट दांडिया क्वीन, सर्वोत्कृष्ट गरबा क्वीन, सर्वोत्कृष्ट जोडी, सर्वोत्कृष्ट ऊर्जा सादरीकरण, सोलो व समूह नृत्य, गायन, शालेय गट आणि खुल्या गटातील स्पर्धांचा समावेश होता. विविध स्पर्धांमध्ये प्रियांका मोरे, जयश्री सारूक, आरती बिडवे, अमृता गौंड आणि पियुश्री पवार यांनी विजेतेपद पटकावले. विजेत्यांना आकर्षक पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. महिला व नागरिकांनी महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या महोत्सवाचे नगराध्यक्ष सुनंदाताई शिवाजी आप्पा कापसे यांनी कौतुक करून आयोजक व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले. महिलांच्या कलागुणांना वाव देणे, आत्मविश्वास वाढवणे, सांस्कृतिक परंपरांचे जतन करणे आणि महिलांना आनंदाचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे, अशा उपक्रमांमुळे शक्य होते, असे त्यांनी नमूद केले. पहिल्याच वर्षी महोत्सवाला मिळालेला प्रतिसाद कौतुकास्पद असल्याचे सांगून भविष्यातही अशा उपक्रमांना सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

महोत्सवाच्या आयोजनात जिजाऊ महिला ग्रुपच्या सौ. कल्पना सारूक, सौ. अनिता घोंगडे, सौ. प्रियांका मोरे, सौ. सौम्या कुलकर्णी व सौ. अनिता पवळ यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच विठ्ठल-रुक्मिणी गणेश मंडळाचे धीरज इंगळे, विशाल बोंदर, आकाश बोंदर, राज खाडे व तेजस परभणे यांनी सहकार्य केले.

मुख्य प्रशिक्षक शिवानी झाडके कळंबकर व आशिष झाडके कळंबकर तसेच सहप्रशिक्षक आर्या हारकर यांनी महिलांना गरबा, दांडिया व तालीचे मोफत प्रशिक्षण दिले आणि विविध स्पर्धांचे नियोजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अनिता पवळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. कल्पना सारूक यांनी केले.

महिलांचा उत्स्फूर्त सहभाग, आयोजकांचे नियोजन आणि सर्वांच्या सहकार्यामुळे महोत्सव यशस्वी झाला. महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे, सामाजिक एकोपा वाढवणे आणि सांस्कृतिक परंपरा जपणे या उद्देशाने आयोजित हा महोत्सव कळंबमध्ये विशेष ठरला.

## रनकोळ बोडणपाडा येथे मेगा नेत्र तपासणी आणि मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डहाणू,(केतन भोज);ता. १६ ऑक्टोबर २०२६ लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३१-१ अंतर्गत लायन्स क्लब ऑफ मुंबई सॅफ्रॉन आणि लायन्स क्लब ऑफ मुंबई एलिट यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच समता संस्कार सेवा फाउंडेशन, जोहार नवरात्र उत्सव मंडळ आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, ऐना यांच्या सहकार्याने रानकोळ बोडणपाडा येथे भव्य मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

विठ्ठल सुतार मैदान, बोडणपाडा, वाणगाव-चारोटी मुख्य रस्ता येथे सकाळी ९ वाजल्यापासून या शिबिराला सुरुवात झाली,या शिबिराचे प्रमुख आकर्षण म्हणजे १०० गरजू रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. याशिवाय नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, मधुमेह तपासणी, रक्तदाब तपासणी करण्यात आली. तसेच गरजूंना अत्यंत कमी किमतीत चष्मे आणि श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले.या प्रकल्पासाठी माजी एमसीसी डॉ. ख्वाजा मुदस्सिर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच, आयपीएलएम अध्यक्ष लायन अक्षय लाडगे,गावच्या सरपंच सौ. वनिता सिकिन करमोडा आणि उपसरपंच श्री. मूलचंद बोलाडा हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी डीसी स्पोर्ट्स लायन मोहन वायदंडे, माजी अध्यक्ष लायन उमेश कोंडवस्कर आणि लायन विनोद वायदंडे हे देखील उपस्थित होते. सफ्रॉन क्लबचे अध्यक्ष लायन जितेंद्र सकपाळ यांनी सर्व मान्यवरांचे आणि ग्रामस्थांचे मनापासून स्वागत केले. प्रकल्पाचे समन्वयक आणि जीएलटी समन्वयक लायन विजय रायमाने यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. क्लबचे सचिव लायन संजू ससमल यांनी आभार प्रदर्शन केले. हा 'मेघा' प्रकल्प 'समता संस्कार फाउंडेशन' आणि 'जोहार नवरात्र उत्सव मंडळ, सिकिन करमोडा' यांच्या सहकार्याने राबवण्यात आला.

यावेळी परिसरातील शेकडो नागरिकांनी, ज्येष्ठ नागरिकांनी आणि महिलांनी या शिबिराचा लाभ घेतला. नेत्र तपासणी करून मोतीबिंदू निदान झालेल्या रुग्णांची पुढील मोफत शस्त्रक्रियेसाठी नोंदणी करण्यात आली.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी लायन्स क्लब ऑफ मुंबई सॅफ्रॉनच्या टीम सॅफ्रॉनचे विशेष परिश्रम लाभले,समता संस्कारसेवा फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा पिंकी पाटील, रंजिता जैन,जोहार नवरात्र उत्सव मंडळ रणकोळ चे अध्यक्ष मुलचंद बोलाडा, सचिव श्री.सिकिन करमोडा , उपाध्यक्ष प्रवीण गडग कार्याध्यक्ष श्री नितीन करमोडा खजिनदार मंगेश सुतार,अशोक सुतार व मंडळातील सर्व सदस्य तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारी, ग्रुप ग्रामपंचायत आणि स्थानिक मंडळांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.

## क्रॉस कंट्री स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रॉस कंट्री (१० किलोमीटर धावणे) स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूरच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने रौप्यपदक मिळविले, तर महाविद्यालयाची खेळाडू सानिका ऐवळे हिने सुवर्णपदक पटकावले. मुलांच्या गटात सुमित माने याने कांस्यपदक मिळवून महाविद्यालयाच्या यशात भर घातली.





> **सानिका ऐवळे हिला सुवर्णपदक, सुमित माने याला कांस्यपदक; दोघांची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड**

या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर सानिका ऐवळे आणि सुमित माने या दोन्ही खेळाडूंची मेंगलोर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ (राष्ट्रीय) क्रॉस कंट्री स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यापीठस्तरीय स्पर्धेत यश संपादन करून राष्ट्रीय स्तरावर महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याने महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच सर्व उपप्राचार्य, सर्व विभागप्रमुख, जिमखाना समितीचे सदस्य आणि क्रीडा विभागातील प्राध्यापकांनी खेळाडूंचे कौतुक केले.

खेळाडूंना मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्यासाठी महाविद्यालयातील जिमखाना विभागाचे प्रमुख व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अनिल परमार, प्रा. उमेश साळुंखे,कनिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा. विठ्ठल फुले व प्रा. मनोज खपाले तसेच जिमखाना समितीचे सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले.

महाविद्यालयातील खेळाडूंनी मिळविलेल्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला असून, राष्ट्रीय स्पर्धेतही हे खेळाडू उल्लेखनीय कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### शेतकऱ्यांच्या मदतीसाठी प्रकाश भोईर यांची मागणी

## भिवंडी तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यात सन २०२६ च्या खरीप हंगामात पावसाची कमतरता, पिकांचे संभाव्य नुकसान, भूजलपातळीत होणारी घट आणि ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाईची शक्यता लक्षात घेता, तालुक्यातील गावांची तातडीने प्रत्यक्ष पाहणी व गावनिहाय सर्वेक्षण करून दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी, ठाणे आणि भिवंडी तहसीलदार, यांना निवेदन सादर केले आहे.

खरीप हंगामातील पावसाचे प्रमाण, पावसातील खंड, पिकांची सद्यस्थिती, जमिनीतील ओलावा तसेच विहिरी आणि अन्य जलस्त्रोतांमधील पाण्याची उपलब्धता यांची वस्तुनिष्ठ तपासणी करण्यात यावी. ज्या गावांमध्ये पिकांचे नुकसान, पाण्याची कमतरता आणि कृषी उत्पादनात घट झाली आहे, त्या गावांचा स्वतंत्र गावनिहाय अहवाल तयार करावा. केवळ तालुक्याच्या सरासरी आकडेवारीवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष बाधित गावांमधील परिस्थितीचा विचार करावा, अशी मागणी भोईर यांनी केली आहे.

महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासनाच्या दुष्काळ व्यवस्थापन संहितेतील निकषांनुसार पर्जन्यमान, कोरडा कालावधी, पीकस्थिती आणि भूजलपातळीचे अधिकृत मूल्यांकन करण्यात यावे. शासनाने सन २०२६ मध्ये जाहीर केलेल्या दुष्काळसदृश तालुक्यांच्या यादीत भिवंडीचा समावेश आहे किंवा नाही, याची पडताळणी करून त्याबाबत लेखी माहिती द्यावी. भिवंडीचा समावेश नसल्यास फेरतपासणी करून पात्र गावांचा समावेश करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या शेतीक्षेत्राचे तातडीने पंचनामे करून पीकनुकसान, उत्पादनातील घट आणि बाधित शेतकऱ्यांची नोंद घेण्यात यावी. सर्वेक्षणातील त्रुटींमुळे कोणताही पात्र शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. बाधित शेतकऱ्यांना पीकनुकसान भरपाई, आपत्ती सहाय्य, पीककर्ज पुनर्गठन, जमीन महसूल सवलत, कृषीपंपांच्या वीजबिलात सवलत तसेच बियाणे व इतर कृषी निविष्ठांशी संबंधित शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणीही प्रकाश भोईर यांनी केली आहे.

दरम्यान, ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास विहिरी, बोअरवेल आणि नळपाणीपुरवठा योजनांची तातडीने तपासणी करावी. आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती करावी आणि पशुधनासाठी पाणी व चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करावी, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

भिवंडी तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण नागरिक आणि सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीने या मागण्यांची प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी. तालुक्यातील प्रत्यक्ष परिस्थितीची तातडीने पाहणी करून बाधित गावांना दिलासा देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना राबवाव्यात, अशी विनंती शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर यांनी केली आहे.